# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

http://www.dteau.org roaurangabad.dte@gmail.com


**अत्यंत महत्वाचे / अतितात्काळ** जा.क्र.विकाऔ/आस्था-२/२०१०/७३३८

**स्मरणपत्र** दिनांक :०२-११-२०१०

प्रति,

प्राचार्य,

**सर्व विनाअनुदानित पदवी संस्था (मराठवाडा विभाग),**

विषय : **एसएलपी (सी) क्र. १३९४४/२००९**
**भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेल ऑफ इंजिनिअरींग व इतर विरुध्द महाराष्ट्र शासन**

संदर्भ : **१) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्रमांक : २/एनजीसी/न्याप्र/प्राचार्य पदभरती/२०१०/२३२० दिनांक: २८-१०-१०.**
**२) या कार्यालयाचे पत्र क्र विकाऔ/आस्था-२/२०१०/६१५१ दि. १५-१०-१०.**

उपरोक्त विषयाबाबत मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांच्या संदर्भीय पत्रान्वये, या कार्यालयाच्या अधिपत्याखालील संस्थांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील प्राचार्याचे / संचालकांचे पद भरण्याबाबत संस्थेने केलेल्या कार्यवाहीची माहिती सोबत जोडलेल्या विहीत प्रप्रत्रात **(ए,बी,सी,डी)** मध्ये भरुन **तात्काळ** या कार्यालयाच्या **roaest02@gmail.com** या ई-मेल वर सदर माहिती पाठविण्याबाबत कळविण्यात येऊनही ब-याच संस्थेची माहिती अप्राप्त आहे.

**सदर प्रकरण अतिमहत्वाचे व संवेदनशील असून ज्या महाविद्यालयामध्ये नियमित व पात्र प्राचार्य नियुक्त केलेले नसतील अशी महाविद्यालये बंद करणेबाबत मा. सर्वोच्य न्यायालय, नवी दिल्ली यांचेकडुन आदेश निर्गमित होण्याची शक्यता नाकारता येत नाही.**

आपल्या संस्थेची माहिती आजच प्राप्त न झाल्यास होणा-या परिणामास तंत्रशिक्षण संचालनालय किंवा हे कार्यालय जबाबदार राहणार नाही याची नोद घ्यावी.

आपल्या संस्थेतील प्राचार्याचे / संचालकांचे पद भरण्याबाबत संस्थेने केलेल्या कार्यवाहीची माहिती सोबत जोडलेल्या विहीत प्रप्रत्रात **(ए,बी,सी,डी)** मध्ये खाली नमुद केल्साप्रमाणे भरुन **तात्काळ** या कार्यालयाच्या **roaest02@gmail.com** या ई-मेल वर पाठविण्यात यावी.

- ज्या संस्थेने प्राचार्य / संचालकाचे पद भरलेले आहे व त्यांना विदयापीठाची मान्यता किंवा विदयापीठास मान्यतेचा प्रस्ताव पाठविण्यात आला असल्यास **प्रपत्र-ए** मध्ये भरुन पाठवावी.
- ज्या संस्थेने प्राचार्य पद भरले नसेल, मागील २ वर्षापासून प्राचार्याचे पद भरण्यासाठी कोणती पावले उचलली याबाबतची माहिती **प्रपत्र-बी** मध्ये भरुन पाठवावी.
- ज्या संस्थेने असे कोणतेही प्रयत्न केले नसेल त्यांची माहिती **प्रपत्र-सी** मध्ये भरुन पाठवावी.
- संक्षिप्त गोषवारा ( इंनटेक कॅपॅसिटी – २००९-१०,२०१०-११ व इतर सर्व कॉलमधील माहिती भरुन) सदर माहिती **प्रपत्र-डी** मध्ये भरुन पाठवावी.

प्र.सहसंचालक

**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद**

सोबत : विहीत प्रपत्र **(ए,बी,सी,डी)**

प्रत : १) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई (का.क्र.२) यांना माहितीस्तव सादर.
२) या कार्यालयाच्या प्रोग्रॅमर यांना सूचित करण्यात येते की, सदर विहीत प्रपत्र या कार्यालयाच्या संकेतस्थळावर अपलोड करावे.

D:\BHOPE\ASTA-2\slpcformat2.doc